


UNITE FOR GOOD

# अजिंठा

मार्च - २०२६ ● अंक- ९ वा



आर.आय.प्रेसिडेंट
रो.फ्रान्सिस्को अरेइझो



डिस्ट्रीक्ट गव्हर्नर
रो.ज्ञानेश्वर शेवाळे



प्रेसीडेंट
रो.गिरीश कुलकर्णी



ऑन.सेक्रेटरी
रो.सुभाष अमळनेरकर



बुले.कमिटी चेअरमन
रो.कॅ.मोहन कुलकर्णी

Rotary | UNITE FOR GOOD
ROTARY CLUB JALGAON
R. I. Dist. 3030 | Club No. 15512 | RIY : 2025-26
Estd. 6th February 1950

## संपादकीय...

नमस्कार, रोटरी प्रणाम, जय हिंद...

मित्रांनो मार्च २०२६ चा हा ९ वा अंक आपणास सादर करतांना अतिव आनंद होत आहे. मार्च महिना म्हटला की ८ मार्चच्या जागतिक महिला दिनाचे स्मरण होते. महिलांप्रति आदर भावना, ऋण, सन्मान आणि सौजन्य व्यक्त करण्याची संधी या निमित्ताने आपल्याला मिळते. महिलांचे विविध क्षेत्रातील योगदान बघून खरंच खूप आनंद होत असतो. त्यांची प्रगति म्हणजे समाजाची प्रगती. त्यांच्या प्रति असे म्हणावेसे वाटते.

**‘आदिशक्ती तू, प्रभूची भक्ती तू, झाशीची राणी, मावळ्यांची भवानी तू, प्रयत्नांना लाभलेली उन्नती तू’, आजच्या युगाची प्रगती तू!** जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! तसेच मार्च ह्या महिन्याची थीम आहे. ‘वॉटर, सॅनिटेशन आणि हायजिन’. या विषयावर आपण अनेक उपक्रम राबवणार असून साप्ताहिक सभेत यावर माहितीपूर्ण चर्चा/व्याख्यान आयोजित करणार आहोत. या अंकात मागील फेब्रुवारी महिन्यातील सर्व घडामोडी, प्रोजेक्टस्, आपले क्लबचे डी.जी.नानासाहेब शेवाळे यांच्या उपस्थितीतील ओ.सी.व्ही. आपला महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट– राईप बद्दलचा समारोप समारंभ या बद्दल व आपल्या साप्ताहिक सभांबद्दल नेमकी माहिती आपणांस मिळेल. आपले कार्य हीच आपली खरी ओळख असायला हवी असे आपले अध्यक्ष, रोटरी इंटरनॅशनल, फ्रान्सेस्को अरे इझो नेहमी म्हणत असतात. आपल्या क्लबच्या अनेक सदस्यांनी रोटरी फाऊंडेशनला सढळ हाताने मदत केलेली आहे. अनेक मेजर डोनर तसेच पी.एच.एफ. आपल्या क्लबमध्ये आहेत. नुकतेच एके ठिकाणी वाचण्यात आले की, रो.डिस्ट्रीक्ट ३१९२चे डी.जी.इ. रविशंकर डकोजू व त्यांच्या पत्नी पाओला यांनी त्यांच्या एकूण संपत्तीच्या ८५% रक्कम जी अंदाजे ५०० कोटीच्या आसपास आहे ती रोटरी फाऊंडेशनला दान केली आहे. असे अनेक दानशूर आपल्या रोटरीत असल्याने आपली रोटरी आपल्या कार्यात नेहमीच अग्रेसर राहिली आहे. चला आपणही आपल्या परीने रोटरीच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीमध्ये भरघोस योगदान देऊ या ! धन्यवाद !

**– रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी**

## अध्यक्षीय मनोगत...

प्रिय रोटरी मित्रांनो, रोटरी प्रणाम !

फेब्रुवारी महिना आपल्या क्लबच्या दृष्टीने विशेष ठरला. या महिन्यात रोटरी वर्षातील महत्त्वाचा टप्पा असलेली डिस्ट्रिक्ट गव्हर्नर ज्ञानेश्वर शेवाळे यांची अधिकृत क्लब भेट (OCV) यशस्वी झाली. त्यानिमित्त असिस्टंट गव्हर्नर यांच्या उपस्थितीत क्लब असेंब्ली आयोजित करण्यात आली. या संवादातून आपल्या कार्याचा आढावा, आगामी दिशा आणि क्लबची वैशिष्ट्ये मांडण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळाली. OCV म्हणजे केवळ औपचारिक भेट नव्हे, तर आत्मपरीक्षण आणि गुणवत्तावृद्धीचा क्षण आहे.

या महिन्यात आपण सामाजिक बांधिलकी जपत "No Forward Without Thinking" या उपक्रमांतर्गत जनजागृती अभियान राबविले. डिजिटल माध्यमातील जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी आठ स्वतंत्र डिझाईन्स तयार करून त्या व्यापक प्रमाणात समाजमाध्यमांद्वारे प्रसारित करण्यात आल्या. हा उपक्रम रोटरीच्या नैतिक मूल्यांशी सुसंगत असा परिणामकारक संदेश देणारा ठरला. तसेच एका सभेमध्ये आओ लकीरे मिटाए हा नाट्यप्रयोग सादर करून सामाजिक ऐक्याचा प्रभावी संदेश देण्यात आला.

आगामी काळात प्रलंबित कामे पूर्ण करण्यावर विशेष भर राहील. जागतिक महिला दिनानिमित्त तसेच संबंधित डेसिगनेटेड मंथच्या अनुषंगाने सभा व उपक्रम राबविण्यात येणार आहेत. रोटरॅक्टच्या सहकार्याने रिल स्पर्धा आणि डिस्ट्रिक्ट पातळीवरील बुक रिव्ह्यू स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. आदिवासी बांधवांसाठी महुआ (मोह) फुलांपासून पौष्टिक पदार्थ जसे काजूकतली व खीर तयार करण्याची कौशल्याधारित कार्यशाळा घेण्याचाही मानस आहे. स्वावलंबन आणि पोषण या दोन्ही दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल.

रोटरी वर्षातील उर्वरित चार महिने आपल्या हातात आहेत. अधिकाधिक लोकोपयोगी, परिणामकारक आणि शाश्वत उपक्रम राबविण्यासाठी आपल्या सर्वांच्या सक्रिय सहभागाची आवश्यकता आहे. चला, एकत्र येऊया आणि सेवेतून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवूया.

Unite for Good !

**– रो.गिरीश कुलकर्णी**

## साप्ताहिक सभा

# फेब्रुवारी महिन्यातील साप्ताहिक सभा

**✻ दि.६ फेब्रुवारी –** या दिवशीची साप्ताहिक सभा ही आपण रोटरी क्लब, जळगाव इलाईट बरोबर संयुक्त विद्यमाने पब्लिक मिटींग म्हणून आयोजित केली होती. यावेळी प्रख्यात अर्थतज्ञ सी.ए.श्री.श्रीराम देशपांडे धुळे यांचे केंद्रीय अर्थसंकल्प–२०२६ या विषयावर अतिशय अभ्यासपूर्ण व उद्‌बोधक व्याख्यान झाले. मंचावर अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी, सचिव रो.सुभाष अमळनेरकर,रो.राजेश वेद तसेच रो.क्लब इलाइटचे अध्यक्ष व सचिव होते. रो.डॉ.शुभदा कुळकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. दोन्ही क्लबच्या सदस्यांबरोबर शहरातील अनेक नागरिक यावेळी उपस्थित होते. याच दिवशी आपल्या क्लबचा ७७ वा चार्टर डे साजरा करण्यात आला.







**✻ दि. १३ फेब्रुवारी –** या सभेत गांधी रिसर्च फाऊंडेशन पी.जी.डिप्लोमा विद्यार्थ्यांनी एकतेचा संदेश देणारे 'आओ लकीरे मिटाए' हा एक छोटा परंतु विचार प्रवर्तक व हृदयस्पर्शी नाट्यप्रयोग सादर केला. फेब्रुवारी महिन्याच्या 'शांतता निर्माण व संघर्ष निवारण' या घोषवाक्याला अनुसरून हा नाट्यप्रयोग आयोजित केला होता. क्लबचे अनेक सदस्य व त्याचे कुटुंबिय यावेळी बहुसंख्येने हजर होते. रो.सुबोध सराफ व रो.ॲन.रेश्मा चांदवाणी यांनी यावेळी नाट्य प्रयोगाबद्दल मनोगत व्यक्त करून कलाकारांचे कौतुक केले.

**✻ दि.२० फेब्रुवारी –** या दिवशी 'क्लब असेंब्ली' होती. यावेळी असि.गव्हर्नर रो.डॉ.अपर्णा भट यांच्या उपस्थितीत रो.डॉ.जयंत जहागीर, रो.संदीप शर्मा, रो.डॉ.शुभदा कुलकर्णी, रो.कॅप्टन मोहन कुलकर्णी, रो.जितेंद्र ढाके, रो.प्रदीप खिवसरा, रो.केदार मुंदडा, रो.राकेश चव्हाण, रो.योगेश गांधी, रो.कमलेश चांदवाणी, रो.डॉ.पवन बजाज इ. रोटेरीयन्सनी त्यांच्या कमिटी बद्दल माहिती दिली. अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी असि.गव्हर्नर रो.डॉ.अपर्णा भट यांचा सत्कार केला. डॉ.अपर्णा भट यांनी सर्व कमिटी चेअरमनचे चांगले प्रेझेंटेशन केल्याने अभिनंदन केले. मा.सचिव रो.सुभाष अमळनेरकर यांनी आभार मानले.



# साप्ताहिक सभा

## प्रांतपालांची क्लब भेट (OCV)
## एक संस्मरणीय आणि प्रेरणादायी दिवस– रो.गिरीश कुळकर्णी

रोटरी वर्षातील अत्यंत महत्त्वाचा दिवस असलेली प्रांतपालांची अधिकृत क्लब भेट (OCV) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. प्रांतपाल रो. ज्ञानेश्वर शेवाळे यांचे सकाळी औपचारिक स्वागत करण्यात आले आणि दिवसाची सुरुवात क्लब प्रशासन व दस्तऐवजीकरणाच्या सविस्तर आढाव्याने झाली.

सर्व नोंदी, अहवाल, आर्थिक व्यवहार, प्रकल्प दस्तऐवजीकरण आणि रोटरी प्रोटोकॉलचे पालन यांची प्रांतपालांनी अत्यंत बारकाईने तपासणी केली. क्लबची शिस्तबद्ध कार्यपद्धती, परिपूर्ण दस्तऐवजीकरण आणि नियोजनबद्ध अंमलबजावणी यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. डिस्ट्रिक्टमध्ये रोटरी क्लब जळगावची ओळख शिस्त, प्रोटोकॉल पालन आणि संघटित कार्यपद्धतीसाठी आहे हे पुन्हा अधोरेखित झाले.

यानंतर क्लब सदस्यांसोबत सविस्तर संवाद सत्र झाले. क्लबची उद्दिष्टे, सात फोकस एरिया अंतर्गत उपक्रम, सार्वजनिक प्रतिमा आणि सदस्य सहभाग यावर सकारात्मक चर्चा झाली. प्रांतपालांनी मार्गदर्शनपर सूचना देत पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी दिशा दिली.

दुपारनंतर राईप प्रकल्पाचा समारोप प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. विद्यार्थ्यांमधील सकारात्मक बदल, अभ्यासातील प्रगती आणि त्यांना मिळालेला आत्मविश्वास हे पाहून प्रांतपालांनी समाधान व्यक्त केले. शिक्षणाचा मुलभूत हक्क आपण या विद्यार्थ्यांना मिळवून दिल्याचे गौरवोद्गार काढले.

संध्याकाळच्या सभेत क्लबच्या नाविन्यपूर्ण, कमी खर्चातील आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या चाकोरीबाहेरील उपक्रमांचे विशेष कौतुक झाले. शिक्षण, आरोग्य आणि चांगला नागरिक घडविण्यावर केंद्रित कामामुळे क्लबची वेगळी ओळख निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले.

प्रांतपालांनी दिलेले गौरवपूर्ण अभिप्राय, सकारात्मक निरीक्षणे आणि उत्साहवर्धक शब्द हे सर्व सदस्यांसाठी प्रेरणादायी ठरले. हा दिवस केवळ मूल्यांकनाचा नव्हता; तो आत्मपरीक्षण, एकात्मता आणि नव्या ऊर्जेचा दिवस होता. प्रांतपालांच्या क्लब भेटीने कार्याची दिशा अधिक स्पष्ट केली आणि उर्वरित कालावधीत अधिक जोमाने व तत्त्वनिष्ठतेने कार्य करण्याची प्रेरणा दिली.









# प्रोजेक्ट

# फेब्रुवारी महिन्यातील प्रोजेक्ट
## No Forward Without Thinking

* **दि. ६ फेब्रुवारी –** आजची साप्ताहिक सभा/पब्लिक मिटींग झाल्यानंतर याच ठिकाणी एक आगळा वेगळा प्रोजेक्ट राबविण्यात आला. आजच्या या डिजिटल युगात अनेकदा आपण जसा मेसेज आला तसा लगेच काही न विचार करता पाठवतो. त्यामुळे कितीतरी समाज घातक किंवा अपायकारक परिणामाना आपल्याला सामोरे जावे लागते. त्या दृष्टीने या फेब्रुवारी महिन्याच्या Peace Building and Conflict या थीम प्रमाणे रोटरी क्लब जळगावने पुढाकार घेऊन याबाबत **No Forward Without Thinking** या आशयाचे पोस्टर बनवून सर्व स्तरातील नागरिकांना पाठवून त्यांना सतर्क करण्याचे एक नाविन्यपूर्ण काम केले आहे. या सवयीचे आपल्या लक्षात येईल हळूहळू सगळेच गुलाम होत चालले आहे. त्यामुळे समाजातील सामजंस्य प्रेम, जिव्हाळा यांचा चांगल्या गुणांचा लय होत चालला आहे. त्याविषयी रोटरी क्लब सदैव पाठपुरावा करणार आहे. याच मालिकेत खालीलप्रमाणे पोस्टर बनविण्यात आले आहेत. (1) No Forward Without Thinking (2) The Four way Test Starts at Forward, (3) Mass Forwarding = Mob Thkinking, (4) Fact Vs Fake (5) One Fake Message Can Brake Many Hearts, (6) Forwarding Can Kill "Reputations, (7) One Forward Can Divide Society, (8) One Wrong Foward Can Put You Behind Bars, (9) Rumours Travel Faster Than Truth. अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी व पी.पी.रो. संदीप शर्मा (Non Medical Committee Chair) या निमित्ताने सर्वत्र कौतुक होत आहे.



















## प्रोजेक्ट

# फेब्रुवारी महिन्यातील प्रोजेक्ट

### रोटरी इग्नीशन प्रोग्रॅम इन एज्युकेशन (RIPE)

*** दि. २७ फेब्रुवारी –** रोटरी क्लब, जळगावने राबवलेला हा एक नाविण्यपूर्ण उपक्रम आहे. यामध्ये १० शाळांमध्ये ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना गणित व भाषा या विषयांचे विशेष मार्गदर्शन करण्यात आले. गेल्या वर्षी विविध शाळांमधून विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात आली होती आणि त्यातून गणित व भाषा या विषयात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांबद्दल माहिती मिळाली. त्या अनुसार यावर्षी शैक्षणिक वर्षात जुलै पासून दर आठवड्याला दोन दिवस दोन तास राइप (RIPE) या प्रकल्पाच्या शिक्षिकांनी वाचन लेखन आणि गणिती क्रिया शिकविल्या. या शिक्षिकांना सुरूवातीला प्रशिक्षण देण्यात आले. ज्यायोगे विविध खेळ आणि नाविन्य कृतीच्या माध्यमातून आनंददायी शिक्षणावर भर दिला गेला. रोटरीच्या बेसिक एज्युकेशन व लिटरसी या अंतर्गत हा प्रकल्प विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबूत करण्यासाठी खूप उपयुक्त ठरला.

या उपक्रमाच्या समारोप समारंभाचे आयोजन दिनांक २७/२/२०२६ रोजी रोटरी हॉल येथे करण्यात आले होते. माननीय प्रांतपाल रो.ज्ञानेश्वर शेवाळे यांच्या अध्यक्षीय मनोगतातून उपस्थित विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना मोलाचे मार्गदर्शन यावेळी मिळाले. हा प्रकल्प विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यात आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यात यशस्वी झाला. याबद्दल प्रांतपाल शेवाळे यांनी रोटरी क्लब जळगावचे कौतुक केले. असि. गव्हर्नर डॉ.अपर्णा भट यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ.वनिता भट यांनी केले. प्रास्ताविक लिटरसी कमिटी अध्यक्ष रो.डॉ.शुभदा कुलकर्णी यांनी केले. या उपक्रमाचा आढावा व लेखा जोखा अध्यक्ष रो.गिरीश कुलकर्णी यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन च्या माध्यमातून सादर केला. विद्यार्थी, शिक्षक, पालक व प्रशिक्षक यांनी यावेळी आपल्या मनोगतातून या प्रकल्पाचे महत्त्व, उपयुक्तता आणि त्यांचे खास अनुभव कथन केले. यात आदिती कुलकर्णी, विनीता भट, मिनाक्षी सुतार, स्वाती महाजन, पल्लवी शिंपी, प्रतिभा शिंपी, कल्पना शिंपी, योगिता पाटील, विजया जोशी, सपना थोरात व हर्षदा भंगाळे या शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण प्रदान केले.

रो.विनया जोशी यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी उत्तम प्रगती केलेल्या विद्यार्थ्यांना प्रांतपाल ज्ञानेश्वर उर्फ नाना शेवाळे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. या उपक्रमात सहभागी शिक्षिकांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. सौ.वसुधा सराफ यांनी संपूर्ण वर्षभर या उपक्रमाचे संयोजन केले. याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी गायलेल्या संपूर्ण 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.





रोटरी मंथ निमित्ताने

## डेसीग्नेटेड मंथ-
## Water, Sanitation & Hygiene Month

### *आरोग्यदायी भविष्यासाठी रोटरीची बांधिलकी*

Rtn. Girish Kulkarni
(President, Rotary Club, Jalgaon)



मार्च महिना रोटरीत Water, Sanitation and Hygiene (WASH) Month म्हणून साजरा केला जातो. स्वच्छ पाणी, सुरक्षित स्वच्छता सुविधा आणि योग्य स्वच्छताविषयक सवयी या केवळ मूलभूत गरजा नसून आरोग्यदायी, सन्मानजनक आणि शाश्वत जीवनाचा पाया आहेत. जगभरातील लाखो लोक आजही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून आणि स्वच्छतागृहांच्या सुविधांपासून वंचित आहेत. या पार्श्वभूमीवर रोटरीने WASH क्षेत्राला आपल्या सात प्रमुख कार्यक्षेत्रांपैकी एक म्हणून अग्रक्रम दिला आहे.

उद्देश आणि दृष्टीकोन– – WASH उपक्रमांचा मुख्य उद्देश म्हणजे, सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, स्वच्छतागृहे व सांडपाणी व्यवस्थापन सुधारणा, हात धुण्याची सवय, मासिक पाळी स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता याबाबत जनजागृती, शाळा व ग्रामीण भागात शाश्वत पाणी व्यवस्थापन प्रकल्प उभारणे

रोटरीचा दृष्टिकोन केवळ सुविधा निर्माण करण्यापुरता मर्यादित नसून, त्या सुविधा दीर्घकाळ टिकाव्यात यासाठी स्थानिक समुदायाचे प्रशिक्षण आणि सहभाग यावरही भर देतो.

रोटरीचे जागतिक कार्य – जगभरात रोटरी क्लबसनी विहिरी बांधणे, पाणी शुद्धीकरण प्रकल्प, शाळांमध्ये स्वच्छतागृहे उभारणे, हँडवॉश स्टेशन बसविणे आणि आरोग्य जनजागृती मोहिमा अशा विविध माध्यमांतून मोठ्या प्रमाणात काम केले आहे. अनेक ठिकाणी ग्लोबल ग्रँटच्या साहाय्याने शाश्वत जलपुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत. स्वच्छता आणि आरोग्य सुधारल्यामुळे बालमृत्यूदर कमी होणे, शालेय उपस्थितीत वाढ आणि महिलांच्या सन्मानात वृद्धी असे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत.

आपला सहभाग आणि उपक्रम– आपल्या क्लबनेही WASH विषयाला प्राधान्य देत जनजागृतीपर कार्यक्रम, स्वच्छता अभियान, शाळांमध्ये आरोग्यविषयक मार्गदर्शन, तसेच सुरक्षित पिण्याच्या पाण्याबाबत जागरूकता निर्माण करण्याचे उपक्रम राबविले आहेत. हात धुण्याचे महत्त्व, प्लास्टिकमुक्त परिसर, जलसंधारण यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करून समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

शाश्वत विकासासाठी एकत्रित प्रयत्न– पाणी आणि स्वच्छता हा विषय केवळ आरोग्याशी संबंधित नसून सामाजिक आणि आर्थिक प्रगतीलाही पूरक आहे. स्वच्छता म्हणजे सन्मान, आणि स्वच्छ पाणी म्हणजे जीवन. रोटरीच्या माध्यमातून आपण या मूलभूत गरजांना स्पर्श करत आहोतहेच आपल्या सेवाकार्याचे सार आहे. चला, या WASH महिन्यात प्रत्येकाने पाणी संवर्धन, स्वच्छतेची सवय आणि समाजजागृतीचा संकल्प करूया.

Unite for Good स्वच्छ – निरोगी आणि सशक्त समाजासाठी!

## उगवते तारे

# 'हमारी बेटियां हमारा अभिमान'

रो.ॲन.डॉ.तरूणा प्रेमशंकर अग्रवाल



हमारी दो बेटियां है। बडी बेटी कोमल और दुसरी छोटी बेटी अंजली! कोमल बचपन से ही पढने मे बहुत तेज थी। उसकी ८ वी कक्षा तक स्कूल की सब पढाई मैंने घर पर ही ली थी। १० वी में उसको ९७.६% मार्क्स मिले और वो डिस्ट्रीक्ट में सेकंड पोझिशन पर आयी। १२ वी में उसको ९७% मार्क्स मिले और वो फर्स्ट पोझिशन पर आयी। सभी प्रवेश परीक्षा पास कर के उसने BITS- Hyderabad में ॲडमिशन लेके मॅथ्स् में एम.एस्सी. किया। इंजिनिअरींग करने में उसकी रूची कम थी। बाद मे उसने University of Georgia, USA से Maths में पीएच.डी. की। इस में उसको पुरी स्कॉलरशिप मिली थी। उसको इसालिए काफी मेहनत करनी पडी। खुद का खाना बनाना, घर की साफसफाई, पढाई यह सब उसने अपने पक्के इरादे के बलबूते पर हासील किया। उसके बाद वो भारत वापस आयी। और उसकी शादी श्री.हिंमाशु राय जो BITS Hyderabad के स्टुडंट थे और गुगल में काम कर रहे थे, उनके साथ हुआी। अब कोमल अमेरिकन कंपनी Chubb में जॉब कर रही है। इस के अलावा कोमल की बॅडमिंटन, डान्स, क्विझ इसमें रूची रही और इसमें काफी ट्रॉफीज उसको मिली है।

मेरी दुसरी बेटी अंजली शुरूसेही शराराती रही है। उससे पढाई करवाना मेरे लिए बहुतही चॅलेंजिंग काम था। लेकीन बाद में उसने अपनी बडी बहन को डिस्ट्रीक्ट में टॉप करने से प्रसिद्धी मिलते हुए देखा तो वो भी काफी फोकस होकर पढाई करने लगी। १० में उसने ९८% प्राप्त किया और वो भी डिस्ट्रीक्ट में टॉपर थी। उसने (फरग्युसन) कॉलेज से B.Sc. और National Insitutte of Virology (NIV) Pune से Virology में Advanced Centre for Treatment, Research & Eduction in Cancer M.Sc. की इस के बाद उसने ACTREC से छे महिने Intership की अब वो Texas, USA में Neurology मे Stem Cell Therapy में Ph.D. कर रही है। यह सब उसने मेहनत करके स्कॉलरशिप मिलाकर किया है। अभी उसको ये अपने अच्छे काम की वजह से Austria में Redbull कंपनी की तरफ से पुरी स्कॉलरशिप मिली है, जो की पुरे दुनिया में सिर्फ ३०० स्टुडंटस् को ही दी जाती है। उसको भी यु.एस.ए. में रहकर यह यश प्राप्त करना इतना आसान नही था। उसे भी कई कठिनाईयों का सामना करना पडा था। जीवन की कठिनाइयां, उसकी हर प्रकार की चुनौतीयां और उसको मात करके आगे जाना इससे मेरे दोनो बेटियों की पर्सनालिटी बहुत अच्छी डेव्हलप हुआी है और उनमें एक नया आत्मविश्वास आया है। कहते है ना की रूप समय के साथ फीका पड जाता है,शक्ती क्षीण हो जाती है, धन कम हो जाता है पर ज्ञानही एक ऐसी संपत्ती है जो समय के साथ बढती जाती है। इसी सोच के साथ मेरे पिताजी ने जो खुद पीएच.डी. है, मुझे भी पीएच.डी. करवाया और अब मेरी दोनो बेटिया पीएच.डी. है। हमारी तीनो पिढी में पीएच.डी. होने से हमारे परिवार का मान बढ गया है और समाज में एक अच्छी पहचान हो गयी है। कोमल का पीएच.डी. होने में और दो साल बाकी है। उसकी एक खासियत है वो Time Management की बहोत पक्की है और पढाई, मेहनत के साथ अपने स्वास्थ्य का भी खयाल रखती है। योगा और मेडीटेशन करके अच्छी Planning करके वो अपना Goal जरूर हासील करेगी ये हम सब को विश्वास है। मेरे पति और उनके पिता श्री.प्रेमशंकर अग्रवालजी का उनको बहोतही सपोर्ट रहता है, मार्गदर्शन रहता है। मुझे हमारी बेटियों के बारे में लिखने के लिए रोटरी क्लब, जलगांव ने मौका दिया, इसलिए मैं उनकी आभारी हूँ। धन्यवाद !

## बॉलीवुड टाईम्स

### शक्ति

रो.सुबोध सराफ



मै आप की ये भी बात याद रखूंगा' ......... उद्विगतेने अमिताभ हा डायलॉग बोलून दिलीप कुमारच्या कॅबिनचा आत बाहेर करणाऱ्या दरवाजाला बेफिकिरपणे ओलांडून बाहेर पडतो...... हा प्रसंग थेट लहान अमिताभ किडनॅप झालेला ...... व दिलीप कुमार चा आवाज (पोलीस कमिशनर मुंबई) त्याला ऐकू येत......' मार दो उसे .. खतम कर दो उसे ...जो बन पड़े वो कर लो ....लेकिन मै हवालात मे बंद यशवंत को नहीं छोडूंगा ......' लहान मुलाच्या मनावर परिणाम व्हायला एवढे डायलॉग पुरेसे ठरतात.....व पिता–पुत्र संघर्षाची नांदी सुरु होते.....ती अखेर पर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवते.....दिलीप कुमार....अमिताभ या दोघांनीही ज्या व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत त्याला तोड नाही....राखी व स्मिता पाटील या दोन्ही अभिनेत्रिंनी सुरेख साथ केलेली आहे.....खास करून राखी...अमिताभची 'आई' ती या सिनेमात झालेली आहे..नवऱ्याची पाठराखण करणारी व त्याच्या 'इमानदरीचा सार्थ 'अभिमान' बाळगणारि 'खंबीर स्त्री' अतिशय 'समरसतेने' उभी केली आहे...स्मिता बद्दल प्रश्नच नाही ..... ग्लॅमरस ..समंजस दोन्ही रोल ती प्रभावीपणे निभावते.....आणि हतबलता तिच्याही वाट्याला आहेच.....दिलीप कुमार व अमिताभ प्रत्येक प्रसंगात एकमेकांसमोर तितक्याच ताकदीने उभे राहतात...मग तो जेल मधला प्रसंग असो.....'बँड स्टँड' वरचा असो वा शेवटी आपल्या मुलालाच बेड्या ठोकण्याचा प्रसंग असो ...दोघाही दिग्गजांनी कुठलीही कसूर ठेवलेली नाही व स्क्रिप्ट राइटर ने हि प्रसंग वादातीत लिहिले आहेत...'संवाद.....'भूमिका..' आर्तता ..व्यकुळता ...कणखर आणि बेफिकीर वृत्ती..ओढ अशा विविध भावनिक पातळ्यांवरून हा सिनेमा पुढे सरकत जातो व शेवटी न टाळता येणारा 'संघर्ष' मुलाच्या मृत्यूने संपतो......मला वाटत 'तो' जीवाच्या आकांताने पळणारा 'अमिताभ'त्याच्या चाहत्यांसाठी कायम स्मरणात राहणारा....'पळाव' तर ते सुद्धा त्यानेच 'एअरपोर्ट' वरील हा अखेरचा प्रसंग हेलावून सोडणारा ....दिलीप ..अमिताभ ..सलीम –जावेद...रमेश सिप्पी.....यांना सलाम....एक अप्रतिम संघर्ष या सर्वांनी पडद्यावर् ज्या तडफेने 'साकारला ' आहे. हा 'सार्वकालिक' आहे अविस्मरणीय असा आहे.....

## गोल्डन वर्डस्

### Book Review

रो.पंकज व्यवहारे



**Title: How to Read A Person like Book**
**Author: Gerard Nierenberg**
**Publisher: Muttex**
**Type: non fiction**
**Published in: 2010**

**Best quote in the book:** Learn the clues that make reading people easy.

***Review:***

Very useful book ever created on Body Language. It is said that body never lies. Before entering our visiting cards our presence and body language reaches early. We express our feelings, attitudes, and motives through gestures that are often vague and frequently ignored. How to Read a Person Like a Book teaches you how to "decode" and reply to nonverbal signals from strangers, friends, and business associates, allowing you to: gain command of business and social situations; sharpen your negotiating skills; recognize signals of affection and attraction; enrich your knowledge of body language; and much more!

*About author: Gerard Nierenberg*

Gerard Irwin Nierenberg was an American lawyer, author, and expert in negotiation and communication strategy. In 1966 he founded The Negotiation Institute where he began a legacy of government, corporate, and non-profit organizational reform based on his ideas of how negotiation impacts the lives of everyone, and he published 22 books on negotiation

## यश, निवड, अभिनंदन

* रो.पंकज व्यवहारे यांची 'रेडिफ गुरू' च्या एक्सपर्ट पॅनलवर करीअर विषयी प्रश्नांवर माहिती देण्यासाठी पॅनल सदस्य म्हणून निवड झाली. अभिनंदन !
* पालघर येथे १८ ते २२ फेब्रुवारी दरम्यान ग्लोबल कोकण महोत्सवात 'राजा रयतेचा' हे महानाट्य जळगावच्या शिवरत्न प्रतिष्ठानतर्फे सादर करण्यात आले. त्याबद्दल प्रतिष्ठानचे अध्यक्ष रो.जयवर्धन नेवे व त्यात महाराणी जिजाऊंची भूमिका निभावणाऱ्या रो.स्वाती ढाके यांचे अभिनंदन !
* दि.२२/२/२०२६ रोजी मराठा प्रिमियर लीग तर्फे जळगावचे ज्येष्ठ रोटेरीअन व सुप्रसिद्ध शल्य विशारद पी.पी.रो.डॉ.दीपक पाटील यांचा सत्कार केला. तसेच त्यांच्याच शुभहस्ते या बॉक्स क्रिकेट स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू यांस पारितोषिक देण्यात आले. अभिनंदन !
* महाराष्ट्र शासनातर्फे 'करिअर कट्टा' हा उपक्रम राबविला गेला. या उपक्रमात मुळजी जेठा महाविद्यालय करीअर कट्टा संचालक डॉ.शमा सराफ यांच्या नेतृत्वाखाली त्यांना एकूण ८ राज्यस्तरीय पुरस्कार राज्याचे उद्योगमंत्री मा.ना.श्री.उदय सामंत व महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग महामंडळाचे अध्यक्ष रविंद्र साठे यांच्या हस्ते देण्यात आले. यात प्रामुख्याने उत्कृष्ट करीअर कट्टा राज्यस्तरीय तिसरे (रू. पन्नास हजार) विभागीय पहिले तसेच उत्कृष्ट करीअर संसद AWS Career Tour- राज्यस्तरीय दुसरे, सोलर एनर्जी अवेअरनेस प्रोग्राम: राज्यस्तरीय दुसरे, करीअर कट्टा रिल सपर्धा: राज्यस्तरीय सर्वात जास्त व्हुअर्स (दोन लाख सत्तावन्न हजार) या महत्त्वाच्या पुरस्काराचा समावेश आहे. अभिनंदन !
* रो.ॲड.हेमंत भंगाळे यांची भारत सरकार नोंदणीकृत ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समिती तर्फे त्यांनी सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी केल्याबद्दल त्यांना 'राष्ट्रीय समाजभूषण' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिनंदन !

---

## -- क्षणचित्रे --



